पारधी विकास कार्यक्रमाखाली मंजूर केलेली घरकुले शबरी आदिवासी घरकुल योजनेचे निकषानुसार बांधण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग,

## शासन निर्णय क्र. घरकुल-२०१६/प्र.क्र.३७/का.१७

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ मे, २०१६.

वाचा :- १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.घरकुल-२०१२/प्र.क्र.३८ ( भाग-१)/का.१७, दि. २८ मार्च, २०१३.
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.घरकुल-२०१२/प्र.क्र.३८ (भाग-१)/का.१७, दि. ७ ऑगस्ट, २०१४.
३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.घरकुल-२०१५/प्र.क्र.२१० /का.१७, दि. ५ जानेवारी, २०१६.
४) शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र. पारधी-२०१४/प्र.क्र.९१/का.१७, दि. ३० जानेवारी,२०१६.
५) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.इंआयो-२०१५/प्र.क्र.४१३/योजना-१०, दि. १० फेब्रुवारी, २०१६.
६) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग क्र.घरकुल-२०१६/प्र.क्र.३७/का.१७, दिनांक १५ मार्च, २०१६.

**प्रस्तावना :-**

आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी पारधीविकास कार्यक्रमाकरिता अर्थसंकल्पित असलेल्या रु.२४.०० कोटी इतक्या निधीपैकी ७० % प्रमाणे बी.डी.एस. वर उपलब्ध असलेला रु. १६.८० कोटी इतका निधी पारधी समाजातील लाभार्थ्यांकरिता घरकुले, विविध क्षेत्रातील रोजगारार्थ कौशल्य विकास प्रशिक्षण, युवकांना व्यवसाय सुरु करण्यासाठी अर्थसहाय्य, शाळाबाहय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता पारधी युवक-युवतींना प्रशिक्षित करणे, बालसंस्कार/बालवाडया चालविणे इ. उपक्रमांसाठी खर्च करण्यास शासन निर्णय, दि. ३०/०१/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. राज्यात राबविण्यात येणाऱ्या इंदिरा आवास योजना या केंद्रपुरस्कृत योजनेसह सामाजिक न्याय विभागाची रमाई आवास योजना, या विभागाची शबरी आदिवासी घरकुल योजना, गृहनिर्माण विभागाची राजीव गांधी निवारा योजना क्र.१ व २ तसेच इतर घरकुल योजनांची प्रभावी अंमलबजावणी व सनियंत्रण होण्यासाठी, ग्रामविकास विभागाच्या संदर्भ क्र.५ वरील दि. १० फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये “राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण

गृहनिर्माण” स्थापन करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील घरकुलांसाठी शबरी आदिवासी घरकुल योजनेमध्ये संदर्भ क्र. ६ वरील शासन निर्णय दि. १५ मार्च, २०१६ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार पारधी विकास कार्यक्रमाखालील घरकुलांचे बांधकाम शबरी आदिवासी घरकुल योजनेच्या निकषानुसार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन यापुढे पारधी विकास कार्यक्रमाखाली मंजूर केलेली घरकुले शबरी आदिवासी घरकुल योजनेच्या संदर्भ क्र.१,२,३,व ६ वरील अनुक्रमे दि. २८ मार्च, २०१३, ७ ऑगस्ट, २०१४, ५ जानेवारी, २०१६ व दि. १५ मार्च, २०१६ नुसार निश्चित केलेल्या निकषानुसार बांधण्यात यावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१६०५२७१२४९५५१३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prabhakar Bapurao Gawade

Digitally signed by Prabhakar Bapurao Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prabhakar Bapurao Gawade
Date: 2016.05.31 13:16:48 +05'30'

**( प्रभाकर. बा. गावडे )**
उप सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई-३५
२) मा. सभापती, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, विधानसभा, विधान भवन, मुंबई.
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
५) मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
7) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) सर्व विधानसभा / विधान परिषद सदस्य
९) मा. प्रधान सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१०) मा. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१२) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
१३) मा.प्रधान सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४) महानगर आयुक्त,मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रविकास प्राधिकरण,बांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई.

१५) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे (पू.) मुंबई.
१६) सर्व मंत्रालयीन विभाग.
१७) महालेखापाल,(लेखा व अुनज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१८)अधिदान व लेखा लेखाधिकारी, मुंबई.
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०) सर्व विभागीय आयुक्त
२१) सर्व जिल्हाधिकारी
२२) सर्व महानगरपालिका आयुक्त
२३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२४)आयुक्त, आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य, नाशिक
२५)आयुक्त, संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२६) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
२७) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
२८)अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर
२९) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
३०) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषद
३१) राज्य संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
३२) वित्त विभाग (व्यय-१४/अर्थोपाय,) मंत्रालय, मुंबई.
३३) सर्व उप सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३४) सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३५) निवड नस्ती-कार्यासन १७,